महाराष्ट्र शासन

क्र.प्रआयो-२०१८/प्र.क्र.९१/योजना-१०
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, २५, मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई -४०० ००१
दिनांक : १६ मार्च, २०१८.

प्रति,
संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण,
सिडको भवन, ५ वा मजला,
बेलापूर, नवी मुंबई

विषय- पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी
अर्थसहाय योजना- मार्गदर्शन
संदर्भ : (१) आपले जा.क्र.७२४/कावि/आस्था-१/२०१७,
दि.२०.१२.२०१७ रोजीचे पत्र

महोदया,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधीन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, श्रीमती कमळाबाई नारायण कांबळे यांचे नाव प्रधानमंत्री आवास योजनेच्या प्राधान्यक्रम यादीत समाविष्ट असून त्यांचेकडे घरकुल बांधकामासाठी स्वत:ची जागा नाही. त्यामुळे त्या पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजनेमधून अर्थसहाय मिळण्यास पात्र ठरतात. केवळ त्यांनी समितीचे पूर्वपरवागी न घेता परस्पर जागा खरेदी केल्यामुळे त्यांना या योजनेमधून अर्थसहाय देण्यापासून वंचित ठेवणे उचित होणार नाही. त्यामुळे श्रीमती कमळाबाई नारायण कांबळे यांना पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजनेचा लाभ देण्यास हरकत नाही.

२. पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय योजना सुरू करण्याचा निर्णय दि.३०.१२.२०१५ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला. म्हणजेच त्या दिवसापासून योजना अस्तित्वात (In force) आल्याने ग्रामीण घरकुल योजनेतील घरकुल पात्र परंतु घरकुल बांधकामास स्वत:ची जागा नसलेल्या लाभार्थ्यांनी दि.३०.१२.२०१५ नंतर शासन निर्णयातील तरतूदीनुसार खरेदी केलेल्या जागेस अर्थसहाय देणे अपेक्षित असल्याने सदरची धारणा पक्की करण्यात येत आहे.

आपला,
(अ.मा.काळे)
अवर सचिव,ग्राम विकास विभाग

राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य
आवक क्रमांक - ४०३८
आवक दिनांक - २८-३-१८
शाखा - राव्यक/गृनि